महाराष्ट्र पोलीस

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -: प्रेस नोट:-

दिनांक ०३/०६/२०२६

# " जळगाव एम.आय.डी.सी. पोलिसांची धडक कारवाई : मोटार सायकल चोरटा जेरबंद "

===०००==

दिनांक ३०/०६/२०२६ रोजी तक्रारदार नामे दस्तगीर अल्लाउद्दीन पिंजारी, वय ४३, व्यवसाय गॅरेज काम, रा. प्लॉट नं. ४२, गट नं. १९४, सुप्रीम कॉलनी, जळगाव यांनी पोलीस स्टेशनला येऊन तक्रार दिली की, दिनांक २९/०६/२०२६ रोजी रात्री २१.०० ते दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ०५.०० वा.च्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या घरासमोरून फिर्यादी यांची स्प्लेंडर प्रो कंपनीची ग्रे रंगाची एम.एच. १९ बी.सी. ५१६२ असा क्रमांकाची मोटार सायकल व साक्षीदार रिजवान अजहर खान मालकाचे चोरीरी इंटरप्रायझेस नावाचे भंगार खरेदी विक्री दुकानाचे पत्रे उघडलेले शटर उचकावून त्यात ठेवलेले ६,३००/- रु. किमतीचे ०९ किलो वजनाचे पितळचे बारीक तुकडे व पिनाचे बटन असा मुद्देमाल चोरून नेला. वगैरे मा. चे फिर्याद वरून अज्ञात आरोपी विरुद्ध **एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव येथे गुन्हा रजिस्टर क्र. ०५८१/२०२६ BNS कलम ३०३(२), ३३४(१) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी प्रभारी अधिकारी, एमआयडीसी पोलीस स्टेशन श्री. बबन आव्हाड यांना मार्गदर्शनपर सुचना दिल्या त्यानुषंगाने प्रभारी अधिकारी, एमआयडीसी पोलीस स्टेशन श्री. बबन आव्हाड यांनी तात्काळ आपल्या पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकातील पोलीस उप निरी/ चंद्रकांत धनके, पो.हे.कॉ. गिरीश दिलीप पाटील, पो.हे.कॉ. प्रमोद लांडगेसरी, पो.ना. मोतीलाल बोरसे, यांना तात्काळ नमूद गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करून सदर आरोपीस ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुषंगाने गुन्हे शोध पथकाने घटनास्थळी भेट देवुन परिसरातील सीसीटिव्ही कॅमेरे तपासणी सुरु केली तसेच सदर पथकाला विश्वसनिय गोपनिय बातमीदारकडुन माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा **हा आरोपीत नामे शाहरुख खान सलीम खान, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. १७, १६३/३, इंद्रप्रस्थ नगर, पोलीस कॉलनी, सुप्रीम कॉलनी, जळगाव ता. जि. जळगाव** यांनी केलेला आहे. मिळालेल्या माहितीची पडताळणी करत सदर इसम यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे कौश्यल्यपुर्ण चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांचेकडुन गुन्ह्यात चोरून नेलेली **२५,०००/- रु. किमतीची एक स्प्लेंडर प्रो मोसा ग्रे रंगाची क्र. MH-१९-BC-५१६२ मोटार सायकल मिळुन आल्याने जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हे.कॉ. ९११ गिरीश पाटील हे करीत आहेत.**

**सदरची कारवाई मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. नितीन गणापुळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. बबन आहाड, पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, यांचे नेतृवाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उप निरीक्षक / चंद्रकांत धनके, पो.हे.कॉ. गिरीश दिलीप पाटील, पो.हे.कॉ. प्रमोद लांडगेसरी, पो.ना. मोतीलाल बोरसे या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

*****************************************************************************************************




vivo V40 | ZEISS

24mm f/1.88 1/100s ISO213
07/03/2026, 13:43